महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education

नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर -440 001

e-mail :-msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

सुधारित / महत्वाचे कालमर्यादित

पत्र क्र. नाविमं / उमागो / प.मा / प्रात्यक्षिक / २०५२
नागपूर, दिनांक :– ०७/०७/२०२५

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त शाळा व क. महाविद्यालये,
नागपूर विभाग नागपूर.

विषय : माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा (इ. १० वी व १२ वी) जुलै २०२५ मध्ये घेण्यात येणा–या प्रात्यक्षिक / तोंडी / श्रेणी परिक्षेच्या वेळापत्रकाबाबत

संदर्भ : १ राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं / परिक्षा–६ / १७६४, पुणे, दि २२/०६/२०२५
२ राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं / परिक्षा–२ / २४०६, पुणे, दि ०४/०७/२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते कि, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जुन / जुलै २०२५ मध्ये आयोजित करण्यात येणा–या माध्यमिक ( इ.१०वी ) लेखी परीक्षा दि. २४/०६/२०२५ ते ०८/०७/२०२५ व उच्च माध्यमिक परीक्षा दिनांक २४/०६/२०२५ ते दिनांक ११/०७/२०२५ (इ.१२वी) या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. सदर परीक्षांकरिता मंडळामार्फत इंर्टनल– एक्सर्टनल ची नियुक्ती करण्यात येणार नाही. करीता उपरोक्त परीक्षांचे नियोजन शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर करुन त्याचा अहवाल मंडळास सादर करावा. **तसेच परीक्षेचा कालावधी मर्यादित असल्याने आउट ऑफ टर्न ची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येणार नाही**, याची नोंद घेउन संबंधित विद्यार्थ्यांना याबाबत जाणीव करुन देण्यात यावी.

माध्यमिक ( इ.१०वी ) व उच्च माध्यमिक ( इ.१२ वी)ची संदर्भ क्रमांक २ नुसार दि. २४/०६/२०२५ ते दि. ०९/०७/२०२५ या तारखेदरम्यान प्रात्यक्षिक / तोंडी / अंतर्गत मुल्यमापन / श्रेणी परीक्षेचे ऑनलाईन गुण मंडळाकडे सादर करुन ऑनलाईन सादर केलेल्या अंतिम गुण / श्रेणीच्या यादया तसेच प्रात्यक्षिक उत्तरपत्रिका मंडळाकडे खाली दिलेल्या **जिल्हा संकलन केंद्रावर दि. १४/०७/२०२५ रोजी** सादर करावे. त्यासाठी शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपला प्रतिनिधी अधिकार पत्रासह पाठविण्याची व्यवस्था करावी.

<u>संकलन केंद्र– साहित्य वाटप व साहित्य स्विकारणे खालील दिलेल्या संकलन केंद्रावर करण्यात येईल</u>

१ लाल बहादूर शास्त्री कनिष्ठ माहाविद्यालय, भंडारा
२ हिंदी सिटी हायस्कूल. चंद्रपूर.
२ नागपूर विभागीय मंडळ कार्यालय, नागपूर
४ न्यू. इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय, वर्धा
५ शिवाजी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गडचिरोली
६ गुजराती नॅशनल कनिष्ठ महाविद्यालय, गोंदिया

विभागीय सचिवांकरिता
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपी:–
१ सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, पुणे यांचे माहितीस्तव समादराने.
२ विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना माहिती करीता समादराने अग्रेषित
३ शिक्षणाधिकारी(माध्यमिक) जि. प. भंडारा / चंद्रपूर / नागपूर / वर्धा / गडचिरोली गोंदिया यांना माहिती करीता व उचित कार्यवाहिस्तव कळवण्यात येते की आपले अधिनस्त सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन लेखी कळविण्यात यावे.